# नियमित दिवाणी मुकदमा क्र.५५०/२०१९ मधील
# निशाणी क्र.३४ वर आदेश
**CNRNO.MHLA110007402019**

०१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.३, ५ व ६ यांनी त्यांच्या विरुध्द विनाकैफीयत आदेश रदद करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तूत प्रकरणात प्रतिवादी क्र.३, ५ व ६ हे हजर झाले परंतू कोव्हीड–१९ च्या प्रादुर्भावामुळे प्रतिवादी क्र.३ आजारी होता तसेच प्रतिवादीच्या विधिज्ञांचा कोव्हीड–१९ च्या प्रादुर्भावामुळे मृत्यू झाल्यामुळे, प्रतिवादी मुदतीत कैफियत दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रदद करुन देण्यात यावा यासाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन स्पष्ट होते की, सदर प्रतिवादी क्र.३, ५ व ६ यांना समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु सदर प्रतिवादी मुदतीत न्यायालयात हजर राहून कैफियत दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द विनाकैफियत आदेश पारित झालेला आहे. उभय पक्षकारांतीत वाद मिटविण्यासाठी तसेच प्रतिवादी क्र.३, ५ व ६ यांच्या दावा मिळकतीतील हक्कासाठी त्यांना त्यांचे लेखी म्हणणे देणे नैसर्गिक आहे. त्यामुळे अर्जात नमूद कारण, पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत

झाले आहे की, सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे . सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

नि.क्र.३४ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो व प्रतिवादी क्र.३, ५ व ६ यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियतचा आदेश रदद करण्यात येतो.

Digitally signed by KALIDAS SIDRAM SURYAWANSHI
Date: 2021.12.18 17:41:08 +0530

(के. एस. सुर्यवंशी)

दि.१८.१२.२०२१ दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.